ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख ९ एप्रिल, १९५२ अंक १५

## विविध माहिती

**ऑलिंपिक सामन्यांचा विमा**— सुप्रसिद्ध लॉइड्स विमा कंपनीच्या हेलसिंकी येथील संघटकांनीं तेथें भरणाऱ्या जागतिक खेळाच्या सामन्यांचा विमा उतरण्याची तयारी कंपनीतर्फें दाखविली आहे असें समजतें. विम्याच्या हप्त्याचा दर १ टक्का आहे. युद्धाची जोखीमहि स्विकारण्यांत आली असून विम्याची मुद्त सहा महिन्यांची राहील.

**आग्रा येथील बुटांचा धंदा**—आग्रा येथील बुटांच्या धंद्याची पुनर्घटना करण्यासाठी प्रमुख धंदेवाल्यांची एक परिषद नुकतीच भरविण्यांत आली होती. ह्या धंद्यांत सुमारें ४०,००० कामगार पोट भरीत आहेत. सरकारनें नेमलेल्या योजना-विषयक अधिकारीहि धंद्याच्या पुनर्घटनेंत मदत करीत आहे.

**एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें दिलेलीं कर्जें**— १९५१ सालच्या पहिल्या सहामहिन्यांत ह्या बँकेनें परदेशांना १३,७५,९३,००० डॉलर्सचीं कर्जें दिलीं. त्यापैकीं प. जर्मनीला कापसाची आयात करण्यासाठीं म्हणून ५,००,००,००० कोटी डॉलर्स आणि जपानला कापसाची आयात करण्यासाठीं म्हणून ४,००,००,००० डॉलर्स देण्यांत आले. सयामला मालवाहू बोटी खरेदी करण्यासाठी १०,७१,००९ डॉलर्स देण्यांत आले.

**मुंबईला मुलांच्यासाठी ग्रंथालय**— मुंबई प्रांतिक महिला सभेतर्फें विल्सन कॉलेजच्या जागेंत मुलांच्यासाठी एक ग्रंथालय व वाचनालय उघडण्यांत आलें आहे. तें १० जून पर्यंत चालविण्यांत येईल. ५ ते १६ वर्षें वयाच्या मुलांना वाचण्यास योग्य अशीं इंग्रजी व देशी भाषांतील पुस्तकें ग्रंथालयांत ठेवण्यांत आलीं आहेत.

**भारतीय बनावटीचें विमानाचें एंजिन**— बंगलोर येथील इंडिअन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स ह्या संस्थेनें विमानाच्या एंजिनाचा एक आराखडा तयार केला आहे असें समजतें. ह्या नकाशाप्रमाणें तयार करण्यांत यावयाच्या एंजिनाला लागणारें सर्व साहित्य भारतांतच मिळण्यासारखें आहे.

**मलाया विद्यापीठाचा उपक्रम**—मलाया विद्यापीठानें भारताच्या अभ्यासासाठी एक स्वतंत्र शाखा काढण्याचें ठरविलें आहे. मद्रास विद्यापीठांतील माजी प्राध्यापक श्री. नीलकंठशास्त्री ह्यांनीं ह्या कामासाठी मलाया विद्यापीठांत सहा महिने रहावें आणि शाखेची संघटना करण्याचें कार्य करावें, अशी विनंती त्यांना करण्यांत आली आहे.

**इस्पितळासाठी १८ लाखांची देणगी**—जबलपूर येथील एक व्यापारी श्री. जगन्नाथदास मलपानी ह्यांनीं आपली १८ लाखांची स्थावर-जंगम मालमत्ता धर्मादाय देण्याचें ठरविलें आहे. त्याच्या मालमत्तेपासून वार्षिक १ लाख रुपये उत्पन्न होतें. त्याचा विनियोग करून जबलपूर येथें स्त्रियांच्या व मुलांच्या उपयोगासाठीं एक रुग्णालय स्थापन करण्यांत येणार आहे. मरणोत्तर नातेवाइकांनीं कज्जेदलाली करूं नये म्हणून त्यांनीं धर्मादायाचा ट्रस्टच केला आहे. ते आणि त्यांच्या मातोश्री त्यांच्या हयातींत मासिक ३,२५० रुपये घेणार आहेत. श्री. मलपानी निपुत्रिक आहेत.

**काळ्या बाजाराचें इअरबुक**—अमेरिकेंत एक नव्या प्रकारचें इअर-बुक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. जगांतील निरनिराळ्या देशांच्या हुंडणावळीचे आणि सोन्या-चांदीचे काळ्या बाजारांतील दर ह्या पुस्तकांत देण्यांत आले आहेत. गेल्या १३ वर्षांत ११ देशांतील कागदी चलन मातीमोल झालें असून २० देशांतील कागदी चलनाची किंमत निम्मी झाली आहे, असें ह्या पुस्तकांत नमूद करण्यांत आलें आहे.

**हातांत मावणारा टेलिव्हिजन सेट**—बर्मिंगहॅम येथील नॅशनल ट्रेड फेअरमध्यें हातांत मावणारा एक टेलिव्हिजन सेट ठेवण्यांत आला आहे. त्याची उंची ५ इंच, रुंदी २७/८ इंच आणि खोली २॥ इंच आहे. त्याच्या १ इंचाच्या पडद्यावर अधेलीच्या आकाराचें दृश्य दिसतें. एका लहानशा ध्वनिक्षेपकाच्या साह्यानें आवाजहि येतो. हा सेट विकण्यासाठी नसून केवळ नमुन्यादाखल तयार केलेला आहे.

**हिंदी अनुबोधपट**— ब्रिटन, अमेरिका व फ्रान्स या देशांतील चित्रवाणीवरून भारतीय सरकारच्या फिल्म डिव्हिजननें तयार केलेले अनुबोधपट प्रक्षिप्त केले जातात असें समजतें. ह्याशिवाय इतर अनेक देशांतून मामुली व्यापारी पद्धतीनें भारतीय अनुबोधपट व वार्तापट दाखविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**म्हैसूर सरकार आणि रिझर्व्ह बँक**— म्हैसूर सरकारच्या सार्वजनिक कर्जाची व्यवस्था रिझर्व्ह बँक पहाणार आहे असें म्हैसूरच्या राजप्रमुखांनीं जाहीर केलें आहे. बँक ऑफ म्हैसूर ह्या बँकेनें संस्थानांतील रिझर्व्ह बँकेचे एजंट म्हणून काम पहावें अशी सूचनाहि म्हैसूर सरकारतर्फें करण्यांत आली आहे.

## राष्ट्रीयकरणाची पूर्वतयारी कशी करतां येईल ?

( श्री. मुकुंद पु. वाणी, बी. कॉम्., जळगांव )

( २ )

### योजनेची अम्मलबजावणी

योजनेच्या अम्मलबजावणीचा कार्यक्रम सर्व संस्थांकरतां एकसारखा असूं शकणार नाहीं. संस्थेची शेअर भांडवलाची रक्कम, गंगाजळीची पुंजी, डिव्हिडंडचा दर व नफ्याचा आंकडा, इत्यादि दृष्टींनीं संस्थेची कुवत पाहून हा कार्यक्रम संस्थेप्रमाणें वेगवेगळा राहील. कार्यक्रमाची पद्धत जरी एक असली तरी त्याची गती कमी–अधिक राहील.

कांहीं संस्थांच्या बाबतींत प्रथम कांहीं वर्षें शेअर भांडवल वाढविण्यासच मनाई करून थांबावें लागेल. त्यापेक्षां थोड्या बऱ्या स्थितींतिल संस्थांतून वर्ग होणारें भांडवलच तेवढें परत देणें शक्य होईल. हा या कार्यक्रमांतील सर्वसाधारण पहिला टप्पा राहील. यापुढील मुदतींत डिव्हिडंडचा दर कमी करतां येईल व त्यामुळें नफ्यांतील डिव्हिडंडचा हिस्सा ज्या प्रमाणांत कमी होत जाईल त्या प्रमाणांत जास्त शेअर भांडवल परत करतां येईल. या वेळीं अशा संस्थांत ज्या इतर संस्था भागीदार असतील, त्यांस भांडवल परत न करतां प्रथम वैयक्तिक शेअर भांडवलच परत करण्यावर भर द्यावा. अशा प्रकारें या मुदतींत शेअर भांडवलावर द्याव्या लागणाऱ्या डिव्हिडंडची रक्कम बरीच कमी होत गेल्यामुळें संस्थेच्या नफ्यांतून गंगाजळींत जास्त जास्त भर टाकणें शक्य होईल व त्यामुळें योजनेच्या तिसऱ्या टप्प्यांत डिव्हिडंडचा दर आणखी कमी करून संस्थांचेंहि शेअर भांडवल परत करतां येईल व याच वेळीं सरकारला भांडवलाचा कांहीं भाग घेणें शक्य झाल्यास सरकारनें तो घ्यावा. म्हणजे, संस्थेवरील जनतेचा विश्वास वाढीस लागून ठेवीरूपानें बरेंच भांडवल कमी व्याजाच्या दरानें मिळविणें शक्य होईल आणि अशा तऱ्हेनें एका ठराविक मुदतीनंतर संस्था सर्वस्वी राष्ट्रीय मालकीची करून घेतां येईल. उदाहरणादाखल, दहा लाख शेअर भांडवल, दहा लाख गंगाजळी, दोन लाख नफा व शेकडा दहा टक्के डिव्हिडंडचा दर असलेली संस्था या योजनेनुसार दहा वर्षांत संपूर्ण राष्ट्रीय मालकीची कशी करतां येईल हें तळाशीं दिलेल्या कोष्टकांत दाखविलें आहे. दरवर्षी वाढणाऱ्या गंगाजळी इतकेंच शेअर भांडवल परत करावयाचें व संस्थेचा नफा या मुदतींत कायम राहील, असें गृहीत धरून हा कार्यक्रम दाखविला आहे.

पुष्कळशा संस्थांचीं नफा वांटणीचीं पत्रकें पाहिल्यास आपणांस हेंच आढळून येतें कीं संस्थेचा नफा बरवर्षी वाढत असतो; परंतु एक तर शेअर भांडवलांत वाढ झाल्यानें अथवा त्यावरील डिव्हिडंडच्या दरांत वाढ झाल्यानें नफा वाढूनहि संस्थेचें स्वतःचें भांडवल ( गंगाजळी ) मात्र त्या प्रमाणांत वाढत नाहीं. म्हणूनच या योजनेनें या दोन्ही बाबींवर बंधनें घालून पायरी-पायरीनें संस्थेच्या नफ्यावरील हा बोजा कमी करतां येऊन संस्थेचें स्वतःचें भांडवलच तयार करतां येईल. सुरुवातीस जरी हें प्रमाण कमी आढळून आलें अथवा मुळींच आढळून आलेंहि नाहीं, तरी योजनेचा एकेक टप्पा जसजसा पुरा होऊं लागेल तसतसा भांडवलावर द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा बोजा कमी कमी होत जाऊन, तिची स्वतःच्या भांडवलांत भर घालण्याची शक्ति वाढतच राहील व योजनेचें यश जास्त जास्त स्पष्ट दिसूं लागून संपूर्ण राष्ट्रीयकरणाचे सर्व फायदे आपण भोगूं हें निश्चित. ( समाप्त )

---

### आर्थिक मंदीच्या बुडाशीं अनिष्ट प्रवृत्ति व कारवाया

" एकदम आलेल्या मंदीमुळें बाजारांत घबराट उत्पन्न झालेली आहे. परंतु ह्या मंदीचें कारण फाजील औद्योगिक वा शेतीचें उत्पादन नाहीं. देशाची गरज भागविण्याइतकें उत्पादन होत आहे कोठें ? वास्तविक, आपली आजची गरज उत्पादनवाढ हीच आहे. मग मंदीचें कारण कोणतें ? पैशाच्या तंगीनें मंदीस सहाय्य केलें आहे, हें निर्विवाद आहे. परंतु तात्काळ जे करार पुरे केले पाहिजेत, ते कांहींतरी क्षुल्लक कारण पुढें करून अमान्य करावयाचे व टाळावयाचे, ही प्रवृत्ति सध्याच्या संकटाच्या बुडाशीं आहे. ज्यांच्या व्यवहारांत सोडतींचा फारसा अंश नव्हता, अशांचे डोक्यावर त्यामुळें आर्थिक जबाबदाऱ्या पडल्या व त्या पार पाडण्याचें त्यांचेजवळ साहाजिकच सामर्थ्य नाहीं. मंदीचें दुसरें कारण, उपलब्ध पैशाचे मानानें केलेले भरमसाट व्यवहार. नाणेबाजारांतील मंदी व बँकांचा मुक्त हस्तें कर्जे देण्यास नकार, ह्यांनीं त्या अडचणींत भरच टाकली. सध्याची बाजारभावांची खालची पातळी टिकून राहील असें नाहीं. अर्थात् पूर्वीपेक्षां खालच्या पातळीवर दर स्थिरावणें स्वाभाविक आहे. त्यामुळें काळाबाजारवाल्यांना व सांठेबाजांना अद्दल घडेल व समाजास घातक अशा व्यवहारांतून नेहमींच पुंजी साठवतां येईल, ह्या कल्पनेस धक्का बसेल तर तें इष्टच होईल. ":— बँक ऑफ इंडिया लि.चे चेअरमन, सर कावसजी जहांगिर.

| वर्ष | शेअर भांडवल | गंगाजळी | डिव्हिडंडचा दर | नफा | वांटावयाचें डिव्हिडंड | गंगाजळींत भर | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०,००,००० | १०,५०,००० | १०% | २,००,००० | १,००,००० | ५०,००० | ५०,००० |
| २ | ९,५०,००० | ११,०५,००० | १०% | २,००,००० | ९५,००० | ५५,००० | ५०,००० |
| ३ | ८,९५,००० | ११,६५,५०० | १०% | २,००,००० | ८९,५०० | ६०,५०० | ५०,००० |
| ४ | ८,३४,५०० | १२,६५,४३० | ६% | २,००,००० | ५०,०७० | ९९,९३० | ५०,००० |
| ५ | ७,३४,६०० | १३,७१,३५४ | ६% | २,००,००० | ४४,०७६ | १,०५,९२४ | ५०,००० |
| ६ | ६,२८,७०० | १४,८३,६३२ | ६% | २,००,००० | ३७,७२२ | १,१२,२७८ | ५०,००० |
| ७ | ५,१६,५०० | १६,२३,३०२ | २% | २,००,००० | १०,३३० | १,३९,६७० | ५०,००० |
| ८ | ३,७६,९०० | १७,६५,७६४ | २% | २,००,००० | ७,५३८ | १,४२,४६२ | ५०,००० |
| ९ | २,३४,५०० | १९,११,०७४ | २% | २,००,००० | ४,६९० | १,४५,३१० | ५०,००० |
| १० | [ ३,१०,००० सरकारी ] | २०,६१,०७४ | — | २,००,००० | — | १,५०,००० | ५०,००० |

# अर्थ

बुधवार, ता. ९ एप्रिल, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## भारतामधील संपत्तीचें केंद्रीकरण

भारतामधील संपत्तीच्या केंद्रीकरणासंबंधीं कांहीं उद्बोधक माहिती प्रसिद्ध झाली आहे.

कापड, ताग आणि चहाच्या कंपन्यांतील डायरेक्टरांचा विचार केला तर असें आढळून येतें कीं एकच व्यक्ति सरासरी अनुक्रमें १२, १४ आणि २८ कंपन्यांतून डायरेक्टरच्या जागेवर असते. कापडाच्या धंद्यांत ३ व्यक्ती मिळून ३६ जागीं डायरेक्टर म्हणून आहेत. तागाच्या धंद्यांत ४ व्यक्ती ५३ डायरेक्टरच्या जागा अडवून आहेत. एकानें तर १९ कंपन्यांत डायरेक्टराच्या जागा पटकावल्या आहेत. मुंबईतील ६२ गिरण्यांचा अभ्यास करण्यांत आला असता असें आढळून आलें कीं ९ व्यक्ती मिळून २२ कंपन्यांतून मॅनेजिंग एजन्सींचें काम करीत आहेत. तागाच्या धंद्यांतील एकूण भांडवलापैकीं २२ टक्के भांडवल ४ मॅ. एजंटांच्या मालकीचें आहे; आणि ताग कंपन्यांपैकीं २९ टक्के मॅनेजिंग एजन्सीजहि ह्याच व्यक्तींच्या हातीं आहेत. ११२ तागाच्या गिरण्यांचें एकूण भांडवल ५० कोटी रुपयांचें आहे. त्यापैकीं ८ कोटी भांडवल असलेल्या २८ गिरण्या ८ मॅनेजिंग एजंटांच्या हातीं आहेत. दुसऱ्या एका माहितीप्रमाणें, तागाच्या धंद्यांतील एकूण भांडवलापैकीं ६५ टक्के भांडवल आणि कंपन्यांपैकीं ६४ टक्के कंपन्या ८ मॅनेजिंग एजंटांच्या ताब्यांत आहेत. त्यापैकीं तिघेजण २८ कंपन्यांवर नियंत्रण चालवूं शकतात.

भारतांत साखरेचे कारखाने एकूण १३४ असून त्यांचें भांडवल ३५ कोटी रुपये आहे. भांडवलापैकीं २४ टक्के भांडवल आणि २२ टक्के कंपन्या ८ मॅनेजिंग एजंटांच्या नियंत्रणाखालीं आहेत. कोळशाच्या खाणींत गंतलेल्या एकूण भांडवलापैकीं ७६ टक्के भांडवल आणि ५६ टक्के कंपन्या ७ मॅनेजिंग एजंटस् चालवीत आहेत. त्यांच्यापैकीं एकजण तर ७ कंपन्यांचा मॅनेजिंग एजंट आहे. सिमेंटच्या कारखान्यांपैकीं ९० टक्के कारखाने आणि ८१ टक्के भांडवल फक्त २ कंपन्यांच्या मालकीचें आहे. चहाच्या धंद्यांत गुंतलेल्या भांडवलापैकीं ५८ टक्के भांडवल आणि ६२ टक्के कंपन्या ५ मॅनेजिंग एजंटांच्या नियंत्रणाखालीं आहेत. जवळ जवळ १३० चहाच्या कंपन्यांचें केंद्रीकरण २३ मॅनेजिंग एजंटाच्या हातीं झालेलें आहे. एंजिनिअरिंगच्या धंद्यांतील २८ कंपन्यांची माहिती गोळा करण्यांत आली असतां पुढील चित्र दिसतें. ह्या धंद्यांतील ८९ टक्के भांडवल आणि २५ टक्के कंपन्या ह्यांच्यावर अवघ्या दोन मॅनेजिंग एजंटांचा सत्ता चालते. एकूण ३४ विजेच्या कंपन्यांचा अभ्यास करण्यांत आला असतां असें दिसून आलें कीं त्यापैकीं २४ कंपन्यांचा कारभार ४ मॅनेजिंग एजंटस् चालवीत आहेत. त्यापैकीं दोघे तर १८ कंपन्यांवर अधिकार चालवितात. ह्या चौतीस कंपन्यांत जें भांडवल गुंतलेलें आहे त्यापैकीं ७५ टक्के भांडवलावर वरील चार मॅनेजिंग एजंटांची हुकमत चालते. इतर धंद्यांच्या मानानें ताग, कोळसा आणि चहा ह्या धंद्यांत संपत्तीचें व अधिकाराचें केंद्रीकरण अधिक प्रमाणांत झालेलें दिसून येतें.

'अर्था'च्या गेल्या महिन्याच्या अंकांतून 'मॅनेजिंग एजंटाबाबत नवा दृष्टिकोन' ह्या मथळ्याखालीं अग्रलेख लिहिण्यांत आले आहेत. ते अग्रलेख आणि संपत्तीच्या केंद्रीकरणाची वर दिलेली माहिती ह्यांचा वाचकांनीं साकल्यानें विचार करावा. संपत्तीचें केंद्रीकरण कांहीं विशिष्ट मर्यादेबाहेर झाल्यावर राज्यसंस्थेला ह्या बाबींची उपेक्षा करून चालत नाहीं असें दिसून येईल. पं. नेहरू ह्यांनीं फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज पुढें नुकतेंच केलेलें भाषण ह्या दृष्टीनें चिंतनीय आहे.

---

## विजेचें उत्पादन व खप

भारतांतील वीज उत्पादनशक्ति वाढली तरी प्रत्यक्ष वीज उत्पादन १९४९ चे मानानें १९५० सालीं कमीच झालें. मेटुर व कृष्णराजसागर धरणांतील पाणी अत्यंत अपुरें होतें, त्यामुळें मेटुर, शिवसमुद्रम आणि शिमशा हैड्रो इलेक्ट्रिक केंद्रांत विजेचा तुटवडा अनुभवास आला. ऑगस्ट व सप्टेंबर ह्या महिन्यांत मुंबईमधील गिरण्यांत संप चालू होता, त्यामुळें गिरण्यांनीं वीज कमी वापरली आणि सहाजिकच टाटा हैड्रो आणि चोला वीज केंद्रांत वीज कमी तयार झाली. डीझेल तेलाची किंमत पुष्कळ वाढली, त्याचाहि वीज उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला.

१९५० अखेर वीज उत्पादनाचे ५३९ कारखाने होते. त्यांपैकीं २२६ सरकारी व म्युनिसिपल मालकीचे व ३१३ कंपन्यांच्या मालकीचे होते. १९५० मध्यें १,८५,६४६ कि. वॅ. उत्पादनशक्तीचीं नवीं यंत्रें बसविण्यांत आलीं. त्यापैकीं ८३·३% वाफेवर चालणारीं व १६·४% डीझेल तेलावर चालणारीं होतीं.

१९५० अखेर, उत्पादनशक्ति ११·४% वाढून ती १७ लक्ष, १३ हजार कि. वॅ. झाली. त्यापैकीं ५८·६% वाफेच्या शक्तीवरील, ३२·७% हैड्रो–इलेक्ट्रिक व ८·७% तेलावरील होतीं. हैड्रो–इलेक्ट्रिक कारखान्यांची उत्पादनक्षमता ३२·७% होती, तरी विजेच्या एकूण उत्पादनापैकीं ४९·३% उत्पादन त्यांनीं केलें.

विजेचा पुरवठा म्युनिसिपल हद्दीपुरताच अद्याप बहुंशीं मर्यादित आहे; खेडेगांवांतून तिचा प्रसार फारसा झालेला नाहीं. १९५० अखेर, ५,००० लोकवस्तीपेक्षा ज्यास्त वस्तीच्या २,७९२ गांवांना विजेचा पुरवठा चालू होता. ५०,०.०० वस्तीपेक्षा मोठ्या सर्व गांवांना वीज मिळत होती.

विजेच्या एकूण खपापैकीं २६० कोटी युनिटस वीज औद्योगिक कारणांसाठीं व ५३ कोटी युनिटस वीज घरगुती कारणांसाठीं खर्च झाली. म्हणजे, एकूण खपाशीं त्यांचें प्रमाण अनुक्रमें ६२·६% व १२·६% पडलें. १९४६ पासून १९५० अखेर वीज पुरवठ्यांची झालेली प्रगति पुढील तक्त्यांत दिली आहे. १९३९ सालास १०० हा पायाचा आकडा धरून इंडेक्स नंबरद्वारां प्रगति दाखविलेली आहे.

### भारतांतील विजेचें उत्पादन व खप : इंडेक्स नंबर

| | १९३९ | १९४६ | १९४७ | १९४८ | १९४९ | १९५० |
|---|---|---|---|---|---|---|
| यंत्रांची उत्पादनक्षमता ... | १०० | १२६·७ | १२७·० | १३१·९ | १४३·७ | १६०·१ |
| विजेचें एकूण उत्पादन ... | १०० | १५९·४ | १६६·८ | १८७·३ | २०१·० | २०९·१ |
| जाळलेला कोळसा ... | १०० | १६४·० | १७२·९ | २०४·८ | २२७·२ | २३५·० |
| लागलेलें तेलाचें जळण ... | १०० | १३३·४ | १४५·८ | १५४·२ | १६६·५ | १८६·३ |
| कमाल मागणी ... | १०० | १४२·३ | १५३·३ | १६७·७ | १७५·१ | १९०·७ |
| एकूण विक्री ... | १०० | १६०·१ | १६५·० | १८२·९ | १९६·८ | २०४·३ |
| घरगुती वापरासाठी विक्री ... | १०० | १८४·० | २०६·५ | २४९·९ | २८९·२ | ३२०·५ |
| व्यापारी व लहान उद्योगधंदे ... | १०० | २२१·० | २३८·२ | २६६·८ | ३१६·० | ३५२·० |
| औद्योगिक ... | १०० | १६१·९ | १६२·४ | १८०·७ | १८९·६ | १९२·२ |
| वहातुक ... | १०० | १२५·९ | १२८·९ | १३७·६ | १३९·४ | १४३·५ |
| इरिगेशन ... | १०० | १६३·२ | १९४·७ | १८८·३ | २३३·४ | २५१·२ |
| सार्वजनिक दिवे ... | १०० | ९३·३ | १०७·० | १०९·२ | ११८·४ | १२९·५ |
| वॉटर वर्क्स ... | १०० | १५९·६ | १६४·२ | १७१·० | १७५·९ | १८४·३ |

### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

अहवाल सालीं ही बँक शेडयूल्ड झाली. बँकेचे आद्य संस्थापक व तिच्या संचालक मंडळाचे सुरवातीपासूनचे अध्यक्ष कै. श्री. वा. ग. तथा अण्णासाहेब चिरमुले हे अहवालसालीं कालवश झाले. त्यांच्या निर्लोभ व निरलस सेवेस बँक कायमची अंतरली असली तरी त्यांनीं घालून दिलेल्या मार्गानेंच तिचा कारभार यापुढें चालविण्याचा संचालक मंडळाचा निर्धार आहे.

अहवालसालीं बँकेस तिच्या व्यवहारांत रु. ५८,४४९–५–७ चा नफा झाला असून त्यांत गेल्या वर्षाचा शिल्लक नफा रु. ३१२–१४–८ हा मिळविला असतां एकूण नफा रु. ५८,७६२–४–३ राहातो. त्यांतून १४,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून ६% डिव्हिडंडसाठी ३९,५०० रु. चा विनियोग करण्यांत आला. नोकरवर्गास बोनससाठी ४,५०० रु. ची तरतूद करण्यांत आली.

अहवालसालीं बँकेचा व्यवहार वाढता व समाधानकारक आहे. बँकेच्या मुंबई येथें दोन व पुणें, नाशिक व बार्शी येथें शाखा असून त्या सर्व चांगल्या चांगल्या आहेत. सरकारी रोख्यांत दि. ३१–१२–५१ च्या बाजारभावाप्रमाणें घट दिसून येत आहे. परंतु बँकेनें खरेदी केलेले सरकारी रोखे बव्हंशीं दर्शनी किंमतीच्या पेक्षां कमी दरानें खरेदी केलेले असल्यानें व त्यांच्या परतफेडीच्या तारखा अल्प व मध्यम मुदतीच्या असल्यानें डिसेंबर, १९५१ अखेरच्या बाजारभावाप्रमाणें दिसून येणाऱ्या सरकारी रोख्यांतील घटीबाबत स्वतंत्र तरतूद करण्याची जरूरी डायरेक्टरांना भासली नाहीं. (चेअरमन: शंकर हरि साठे, बी. ए., एलएल्. बी. मॅनेजर : सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम. सेक्रेटरी : रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. )

#### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ६,४९,५०५ | कॅश | ८,५३,९०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,६५,००० | बँकांकडील शिल्लक | २,२०,८४९ |
| ठेवी व इतर खातीं | ७३,५८,२१२ | इनव्हेस्टमेंटस | ३६,७९,०६० |
| चालू सालचा नफा | ५८,४४९ | ॲडव्हान्सेस | ३५,११,४२८ |

### सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा.

बँकेचे आद्य संस्थापक श्री. अण्णासाहेब चिरमुले यांचे निधनामुळें बँकेची झालेली हानि संचालक मंडळास फारच तीव्रतेनें भासत आहे, हें डायरेक्टरांनीं अहवालांत प्रारंभींच व्यक्त केलें आहे. कै. अण्णासाहेब जीवनाचे अखेरचे घटकेपर्यंत बँकेस मार्गदर्शन करीत होते आणि बँकेचे आजचे उर्जितावस्थेस खरोखर तेच कारणीभूत आहेत. श्री. वा. ग. तथा अण्णासाहेब चिरमुले हे कालवश झाल्यामुळें या बँकेचे चेअरमन श्री. शंकर हरि साठे यांनीं संचालक मंडळाचे सदस्यत्वाचा राजीनामा दिला व त्यांचे जागीं संचालक मंडळानें ता. ३१–८–५१ रोजीं श्री. शिवराम दामोदर लिमये यांची निवड केली. श्री. शंकर हरि साठे यांना युनायटेड वेस्टर्न बँक लि. चे संचालक मंडळानें डायरेक्टर म्हणून को–आप्ट करून घेतलें व त्यांची चेअरमन म्हणून निवड केली.

बँकेस सालअखेरचे व्यवहारांत मागील सालचा शिल्लक नफा रुपये १,०८४–९–५ जमेस धरून रु. ३,१५०७–१४–११ एवढा नफा झालेला आहे. रिझर्व्ह फंडांत १०,००० रु., इमारत फंडांत ३,००० रु., नोकरवर्गाकरितां बोनस ३,३०० रु. अशा तरतुदी करून ६% करमाफ डिव्हिडंड व ५% व ६% करासह डिव्हिडंड अनुक्रमें ऑर्डिनरी व प्रेफरन्स शेअर्सवर देण्यासाठी १४,७०० रु. चा विनियोग करण्यांत आला. अहवाल सालीं बँकेचा व्यवहार पूर्वीप्रमाणें समाधानकारक झाला आहे. बँकेच्या कराड, मसूर व ओगलेवाडी येथील शाखा व्यवस्थितपणें चालू आहेत. चेअरमन: शि. दा. लिमये, बी. ए., एलएल बी. वकील. मॅनेजर: व. य. कुलकर्णी, एम. ए., बी. कॉम.

#### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,४०,६३० | कॅश | ३,४३,९४९ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,४२,००० | इतर बँकांत शिल्लक | ८७,२८६ |
| ठेवी व इतर खातीं | ४१,८९,९०७ | इनव्हेस्टमेंटस | १९,५४,२५६ |
| निव्वळ नफा | ३०,४२३ | ॲडव्हान्सेस | २६,४५,५१५ |

### हाँगकाँगमधील पहिली हिंदी बँक

हाँगकाँगमध्यें व हाँगकाँगबरोबर, हिंदी लोकांचा व्यापार मोठ्या प्रमाणावर १०० वर्षे चालू आहे. तेथें ता. १८ मार्च रोजीं पहिली हिंदी बँक उघडण्याचा मान युनायटेड कमार्शिअल बँकेस मिळाला आहे. वसाहतीचे फिनॅन्शिअल सेक्रेटरी दि ऑनरेबल ए. जी. क्लार्क हे उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्ष होते. समारंभास प्रमुख सरकारी अधिकारी, परराष्ट्रांचे वकील, परदेशी व चिनी बँकर्स आणि मोठमोठे हिंदी व्यापारी उपस्थित होते. कलकत्त्याहून बँकेचे जनरल मॅनेजर श्री. ठाकूर उद्‌घाटनासाठीं मुद्दाम विमानानें गेले होते. त्यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत, बँकेनें आपल्या शाखांचें जाळें भारत, पाकिस्तान, बर्मा आणि मलाया येथें कसें पसरविलें आहे,त्याचें वर्णन केलें. हाँगकाँग येथेंहि बँकेची शाखा आवश्यक वाटल्यावरून, ती आतां उघडण्यांत येणार आहे असें ते म्हणाले. भारताचें शेतीप्रधान स्वरूप बदलून तो ह्यापुढें कापड, ताग, विजेचें सामान, इत्यादि अधिकाधिक प्रमाणावर निर्गत करूं लागेल, त्याला बँकिंगचेंहि सहाय्य अवश्य हवें. हाँगकाँगमधील चिनी व परदेशी बँकांशीं अत्यंत सलोख्याचे संबंध राखून, यु क. बँक आपल्या गिऱ्हाइकांच्या सेवेस प्राधान्य देईल असें श्री. ठाकूर ह्यांनीं सांगितलें. मि. क्लार्क यांनीं आपल्या भाषणांत, यु. क. बँक ही हाँगकाँगमध्यें नोंदण्यांत आलेली कॉमनवेल्थमधील पहिलीच बँक असल्याचें सांगून तिला सुयश चिंतिलें. ब्रिटिश, अमेरिकन, चिनी, फ्रेंच, डच व बेल्जियम बँकांच्या रांगेंत आतां हिंदी बँक येऊन बसल्याबद्दल त्यांनीं यु. क. बँकेचें अभिनंदन केलें.

बँक नं. ४, क्वीन्स रोड, सेंट्रल, येथें म्हणजे हाँगकाँगच्या बँकिंग केंद्रांत उघडण्यांत आली आहे.

---

### ब्रिटिश नागरिकांचा पैसा कसा खर्च होतो ?

ब्रिटनचें राष्ट्रीय उत्पन्न १९५१ सालांत १९५० पेक्षा ४ टक्क्यांनीं वाढलें. राष्ट्रीय उत्पन्नाचा वट्ट आकडा १२४१·४ कोटी पौंड असा आहे. ह्या उत्पन्नांत परदेशी भांडवलावरील नफा, वहातुकीसारख्या बाबींतून मिळणारा फायदा आणि मालाची किंमत इत्यादी सर्वांचा समावेश करण्यांत आला आहे. इतकें उत्पन्न झालें तरी खर्च त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक झाला. वैयक्तिक खर्चाचा आकडा सुमारें ७१·७ कोटी पौंडांनीं वाढला, आणि निर्यातीपेक्षा आयात ५१·६ कोटी पौंडांनीं अधिक झाली. गेल्या वर्षी वैयक्तिक उत्पन्न ८ टक्क्यांनीं वाढलें, पण मालाच्या व सामाजिक सोयींच्या किंमती १० टक्क्यांनीं वाढल्या. खाजगी मालकीच्या कंपन्या आणि राष्ट्रीय मालकीच्या कंपन्या ह्यांचें उत्पन्न १९५० सालीं २४४·७ कोटी पौंड होतें, तें १९५१ सालीं २९५·३ कोटी पौंड झालें. ही वाढ सुमारे २१ टक्के आहे.

कामगारांचें वेतन ११ टक्क्यांनीं वाढलें व त्यांना अधिक पैसा मिळाला. परंतु पैशाची किंमत कमी झाल्यामुळें त्यांना धूम्रपानांत आणि मद्यपानांत कपात करावी लागली. ब्रिटिश नागरिकांनीं ह्या दोन बाबींवर १५८·९ कोटी पौंड खर्च केलें. खर्चाचें दरडोई प्रमाण काढावयाचें तर तें १९ वर्षांवरील प्रत्येक स्त्री–पुरुषामागें दर आठवड्याला १७ शिलिंग असें पडतें. पूर्वीच्या कोणत्याही एका वर्षापेक्षा ब्रिटिश नागरिकांनीं १९५१ सालीं अधिक दारू घेतली. युद्धखर्चामुळें सरकारी खर्चांत २५ टक्के वाढ झाली. भांडवली माल, नवीन कारखाने, यंत्रसामुग्री आणि इमारती ह्यांच्यासाठीं होणाऱ्या खर्चांत वाढ झाली. सरकारच्या उत्पन्नां- पैकीं प्रत्येक पौंडांतील ८ शिलिंग, ४ पेन्स प्रत्यक्ष करापासून मिळाले. ८ शिलिंग २ पेन्स अप्रत्यक्ष करापासून मिळाले आणि २ शिलिंग राष्ट्रीय विमायोजनेपासून मिळाले. ब्रिटिश नागरिकांनीं आपल्या उत्पन्नांतून विविध बाबींवर पुढीलप्रमाणें खर्च केला. अन्न २४ टक्के, दारू आणि तंबाखू १३ टक्के, घरभाडें, स्थानिक कर व जळण १० टक्के, कपडे ९ टक्के, इतर जिनसा व सोयी २८ टक्के, कर आणि राष्ट्रीय विम्याचे हप्ते १४ टक्के. प्रत्येक पाउंडामागें फक्त २ पेन्स ब्रिटिश नागरिकाला शिलुक टाकतां आले.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

---

### इन्स्टिटयूट ऑफ अकौंटंटसची निवडणूक

इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडियाच्या मुंबई विभाग कौन्सिलवर श्री. पी. जी. भागवत, श्री. एम. पी. चितळे व श्री. ए. व्ही. देशपांडे ह्यांची निवडणूक झाली आहे.

---

**बिगर तिकिट प्रवासी**—चालू वर्षाच्या जानेवारी महिन्यांत मध्य व पश्चिम रेल्वे–रस्त्यावर २,५८,७१७ लोकांनीं तिकिट घेतल्याशिवाय प्रवास केला. ह्या फुकट्या प्रवाशांकडून जादा भाडें व दंड मिळून ५,५८,८२८ रुपये वसूल करण्यांत आले.

**मॉस्को परिषदेला महाराष्ट्रीय तज्ज्ञ**—मॉस्को येथें भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेला हजर राहण्यासाठीं श्री. पु. रं. टोणगांवकर हे महाराष्ट्रीय एंजिनिअर तज्ज्ञ म्हणून रवाना झाले. श्री. टोणगांवकर हे रिएन्फोर्सडसिमेंट काँक्रीटच्या बांधकामाचे तज्ज्ञ आहेत.

---

बार्शी सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि० च्या
सभासदांकरितां

## नोटीस

बार्शी सें. को. बँक लि. ची स्पेशल साधारण सभा बुधवार दिनांक ३० एप्रिल १९५२ दुपारीं ४–३० वाजतां साने मेमोरियल हॉलमध्यें भरणार आहे.

सदर सभेंत खालील कामें करण्यांत येतील:—

(१) दिनांक ३० सप्टेंबर १९५१ च्या वार्षिक सभेचा वृत्तांत कायम करणें.

(२) खालील पोट नियमांत सुचविलेल्या दुरुस्तांचा विचार करणें (पोट नियम ६२ मधील व्याजाचे दरांत दुरुस्ती करणें.)

(३) मे. चेअरमन यांचे परवानगीनें ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

M. V. VISHWARUPE
बार्शी, २–४–५२ चेअरमन
बार्शी सेंट्रल को० बँक लि०

## दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लि, पुणें.

मेल्या वर्षाचा व या वर्षाचा बॅलन्सशीट पाहतां खालीलप्रमाणें प्रगति घ्यानीं येईलः—

| | | सन १९५० | सन १९५१ |
|---|---|---|---|
| डिपॉझिट | रु. | ११,१५,००० | १२,५२,००० |
| वर्किंग कॅपिटल | रु. | १२,२३,००० | १३,४६,००० |
| नफा | रु. | ३,५०० | ५,५०० |

१९५१ सालांत बँकेकडे एकंदर १,२५,००,००० ( सव्वा कोट ) रुपये सर्व खात्यांत मिळून आले. यावरून बँकेच्या वाढीची सहज कल्पना येईल.

रिझर्व बँकेनें प्रसिद्ध केलेल्या १९५० साल अखेरच्या बँकांच्या स्टॅटिस्टिकल टेबल्सवरून असें दिसून येईल कीं, 'सी' क्लासमधील बँकांत वर्किंग कॅपिटल पाहतां मुंबई इलाख्यांत ह्या बँकेचा पहिला नंबर लागतो व हिंदुस्थानांतील बँकांत पांचवा ठामतो.

| | |
|---|---|
| नफातोटा पत्रकांतील नफा | रु. ५,५७२–१०– २ |
| मागील सालचा शिलकी नफा | रु. २८८– १– ८ |
| मिळून एकूण | रु. ५,८६०–११–१० होतो. |

नफ्याची विभागणी खालीलप्रमाणें करण्यांत आली आहे:—

| | |
|---|---|
| गंगाजळी ठेव | रु. १४००– ०– ० |
| बॅड अँड डाउटफुल डेट फंडास | रु. ५००– ०– ० |
| करमाफ डिव्हिडंड ४% | रु. २६००– ०– ० |
| शिल्लक नफा | रु १३६०–११–१० |

बँकिंगचा व्यवहार सुरू करून २। वर्षेंच झालीं. त्या अवधींत झालेली ही प्रगति चालकांस भूषणावह आहे. ( चेअरमनः गं. शि. आढकर वकील, मॅ. डायरेक्टरः काशिनाथ बाळकृष्ण साळवेकर. )

## चांदवड सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास रिझल्ट

नाशिक जिल्ह्यासाठीं भरलेल्या सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, चांदवड येथील परीक्षेचा निकाल लागून खालील विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. एकूण ४४ विद्यार्थी परीक्षेस बसले त्यांपैकीं २ प्रथम-श्रेणींत, ३ द्वितीय श्रेणींत व २१ तृतीय श्रेणींत येऊन एकूण २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ते खालीलप्रमाणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| १. एस. टी. दिघे | १८० | मार्क्स | I क्लास. |
| २. रायाजी मुकुंदराव काळे | १८० | „ | I क्लास. |
| ३. पोपटराव नी. सोनवणे | १६८ | „ | II क्लास. |
| ४. अवधूत बळीराम दीक्षित | १६६ | „ | II क्लास. |
| ५. झावरू शंकर पाटील | १५२ | „ | II क्लास. |

पासक्लास

६. श्रावण भिला दळवी, ७. पंडीत तुळसीराम साळी, ८. सदाशिव यशवंत दाणी, ९. भालचंद्र काळू कोठावदे, १०. छबूलाल राघोसा क्षत्रीय, ११. भास्कर दिगंबर जोशी, १२. शंकर रामचंद्र वर्मेंडी, १३. गंगाधर रंभाजी त्र्यंबके, १४. बाबुराव अमृतराव गायकवाड, १५. शंकर भाऊशेट साळी, १६. नीळकंठ नारायण देशमुख, १७. रंगनाथ नागु सोनवणे, १८. भास्कर शंकर जोशी, १९. वसंत लक्ष्मण क्षत्रीय, २०. श्रीराम विष्णु खैरनार, २१. देवीदास नरहर दाणी, २२. शुक्लेश्वर सोनु धर्माधिकारी, २३. धोंडू लक्ष्मण चव्हाण, २४. काशीनाथ विठ्ठल सोनवणे, २५. पुनमचंद टी. परदेशी, २६. केशव धनजी सोजे.

सही— एन्. वाय. कुलकर्णी
को. ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नाशिक.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना: १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.
शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द्. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.




## पैशाचा पुरवठा वाढवून उत्पादनवाढीस चालना देण्याचें महत्त्व

युनायटेड कमर्शिअल बँक लि. चे चेअरमन, श्री. जी. डी. बिर्ला, ह्यांच्या अध्यक्षीय भाषणांतील महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे:—

"बँकेकडील ठेवींची रक्कम १९५१ अखेर २९.५८ कोटी रुपये होती. बँकेजवळील रोख व बँकांतील शिल्लक रक्कम ५.०४ कोटी रुपये, म्हणजे ठेवींच्या १७% होती. बँकेची रोख्यांतील निर्वेध गुंतवणूक ठेवींच्या १३.५% होती. बँक रेट वाढविल्यामुळें निश्चित व्याजाच्या रोख्यांच्या किंमतींत मोठा उतार झाला. तरी, युनायटेड कमर्शिअल बँकेच्या सतत सावधगिरीच्या धोरणामुळें ती ताळेबंदांत रोखे बाजारभावानें किंवा त्यापेक्षां कमी दरानें दाखवूं शकली. सर्व शेड्यूल्ड बँकांचें कर्जाचें ठेवींशीं प्रमाण ५९.८% पडलें; यु. क. बँकेनें तें ४६.३% राखलें. बँकेचा नफा ३४.०७ लाखांवरून ३५.०१ लाख रुपयांवर गेला. सेन अवार्डमुळें, पगार व भत्ते ह्यांचा खर्च थोडा वाढला. बँकेनें सार्वजनिक व धर्मादाय फंडांना सुमारें ५१,००० रु. च्या देणग्याहि दिल्या.

"भारतांतच नव्हे, तर भारताबाहेरहि शाखा उघडून बँक आपला व्यवहार वाढवीत आहे. मलायांत सिंगापूर येथें व ब्रह्मदेशांत अक्याब येथें बँकेच्या शाखा सुरू करण्यांत आल्या. १८ मार्च रोजीं हाँगकाँग येथें शाखा उघडण्यांत आली. यु. क. बँक ही मोठी व वाढती बँक असली, तरी वयानें लहान आहे. तिला लागणारा तज्ञ आणि लायक अधिकारी व नोकरवर्ग तयार करण्यासाठीं बँकेनें एक स्टाफ ट्रेनिंग कॉलेज सुरू केलें आहे.

"उत्पादन वाढ आणि आर्थिक विकास ह्यांस देशाच्या उद्धाराच्या कार्यक्रमांत अग्रस्थान दिलें पाहिजे. उत्पादन सुधारावयाचें, तर बचतीस व भांडवल निर्मितीस उत्तेजन मिळालें पाहिजे, आपल्यास आर्थिक सहाय्य करणाऱ्या देशांशीं सलोख्याचे संबंध राखले पाहिजेत, सर्वांगीण आर्थिक प्रगतीसाठीं सर्व अंगांस योग्य तें महत्त्व देणारी योजना आखली पाहिजे, कामगारांना तांत्रिक शिक्षण दिलें पाहिजे आणि सामाजिक दृष्टिकोन बदलला पाहिजे.

"गेल्या वर्षीं बँकांनीं कर्जें ज्यास्त प्रमाणांत दिलीं, तीं हिंदी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या गरजेस अनुसरूनच होतीं. किंमती वाढल्यामुळें कर्जाची रक्कमहि ज्यास्त लागली आणि बँकांनीं कर्जें दिलीं नसतीं तर व्यापार व उत्पादन ह्यांत घट झाली असती. त्याचे आर्थिक परिणाम चांगले झाले नसते. कर्जावरील बंधनें देशाच्या उत्पादनशक्तीवर अनिष्ट असा परिणाम करीत आहेत.

"तीन महिने मुदतीच्या हुंड्यांचे स्वरूपांत कर्जें देण्याची नवी सोय रिझर्व्ह बँकेनें सुरू केली आहे, ती अगदीं योग्य अशीच आहे आणि त्या योजनेस सर्व बँकांनीं हार्दिक पाठिंबा दिला पाहिजे. १९५१ च्या मंदीच्या मोसमांतहि नाणेबाजारांत जरा तंगीच राहिली, ह्याचीं कारणें अशीं आहेत:—(१) उत्पन्न-खर्चांत मोठा वाढावा उरविणाऱ्या सरकारी अंदाजपत्रकानें चलन आकसून घेतलें. (२) आयातीवर बंधनें जरा सैल करण्याच्या धोरणामुळें आणि अन्नधान्याच्या आयातींत मोठी वाढ झाल्यामुळें, देशांतील पैसा आटत गेला. (३) निवडणुकींवर सुमारें ५० कोटी रु. खर्च झाला असावा. ह्यापैकीं बरीच मोठी रक्कम बँकांनींच पुरविली असल्यामुळें, व्यापार-उद्योगधंद्यांना कर्जें कमी प्रमाणांत उपलब्ध होणें अपरिहार्य झालें.

"व्यापार व उद्योगधंदे ह्यांस पैशाचा पुरवठा सुलभतेनें पुनः होईल अशी व्यवस्था करणें, हें सरकारच्या आर्थिक धोरणाचें महत्त्वाचें अंग असावयास हवें. त्यासाठीं ट्रेझरी बिलांच्या द्वारा फंड उभा करतां येईल. आयातविषयक धोरणाचीहि पुनः छाननी करणें योग्य होईल. अन्नधान्याच्या आयातीच्या आवश्यकतेबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. परंतु, अंतर्गत उत्पादन व विदेशी उत्पादन ह्यांत स्पर्धा निर्माण होईल, असें मात्र आयातीसंबंधांत कांहींहि करतां कामा नये.

"परराष्ट्रीय व्यापारांतील येण्या-देण्याची आपली परिस्थिति समाधानकारक नाहीं. अन्नधान्याची आयात मोठ्या प्रमाणावर चालू आहे आणि नेहेमी निर्गत होणाऱ्या प्रमुख हिंदी मालास परदेशांतील मागणी उतरत चालली आहे. तेव्हां आपली आयात वाढविली पाहिजे. ह्या दृष्टीनें ताग, भुइमुगाची वगैरे तेलें, इत्यादींवरील निर्गत कर कमी केल्याची सरकारची घोषणा स्वागतार्ह आहे. आवश्यक योजनांवरील खर्च कमी करून भरभराट निर्माण होऊं शकणार नाहीं. सरकारी उत्पन्न-खर्चांत मोठा वाढावा निर्माण करूं पहाण्यानें अथवा दुःस्थिति निर्माण होईल इतक्या खालच्या पातळीपर्यंत किंमती उतरविल्यानेंहि आर्थिक उन्नति होणार नाहीं. औद्योगिक व शेतीचें उत्पादन वाढेल, अशा दृष्टीनें पैशाचा विनियोग केला पाहिजे. पैशाचा पुरवठा वाढविण्यासाठीं थोडी चलनवाढ करावी लागली, तरी हरकत नाहीं. ह्या धोरणामुळें प्रथम किंमती थोड्या चढतील. परंतु, वर्षा-दोन वर्षानंतर मालाचें उत्पादन जसें वाढेल त्या मानानें किंमती उतरतील आणि त्या खऱ्या भरभराटीचें निदर्शक होतील. कारण, त्यांत मालाचा मोठा पुरवठा, रोजगारांत वाढ आणि मर्यादित किंमती, हीं सर्व असलेलीं आढळतील."

### टोटोमीटर : नोटा मोजणारें यंत्र

चलनी नोटांची संख्या आतां पुष्कळच वाढली आहे आणि बँकांतून नोटांची देवघेव फारच मोठ्या प्रमाणावर होते. मिडलंड बँकेच्या वेस्ट एंड शाखेंत दररोज ९ कोटी पौंडांच्या नोटा मोजाव्या लागतात. सराईत कॅशर तासाला ५,००० नोटांपेक्षां ज्यास्त नोटा मोजूं शकत नाहीं व ही गतिहि फार वेळ टिकत नाहीं. पुढें चुका होऊं लागतात. तेव्हां नोटा मोजणाऱ्या यंत्रास कितीतरी वाव आहे. असें यंत्र मिडलंड बँकेनें तिच्या वेस्ट एंड शाखेंत नुकतेंच बसविलें आहे. ज्या शाखांतून कॅशची देवघेव मोठी होते, अशा सर्व शाखांत अशीं यंत्रें बसविण्याचा बँकेचा विचार आहे. ह्या यंत्रास 'टोटोमीटर' असें नांव देण्यांत आलें आहे. हातानें मोजण्याच्या गतीपेक्षां 'टोटोमीटर'ची गति किमान तिप्पट तरी आहे.

**ब्रिटनचें प्रचंड मालवाहू विमान**— ब्रिटनच्या पुरवठा खात्यानें मालाची वहातूक करणारें एक प्रचंड विमान बांधण्याची मागणी नोंदविली आहे. हें विमान २० टन वजनाचा माल नेऊं शकेल आणि १,००० यार्ड लांबीच्या विमानतळावर उतरूं शकेल. 'युनिव्हर्सल फ्रेटर' ह्या विमानाच्या जातीचें पण सुधारलेलें असें हें विमान असेल.

## चहाच्या धंद्यापुढील कांहीं प्रश्न

हिंदच्या चहाच्या धंद्याला महायुद्धाच्या काळांत व नंतर चार वर्षे विशेष तेजी होती. परंतु गेल्या एका वर्षांत इतर देशांचें उत्पादन वाढल्यामुळें हिंदच्या चहाला बाहेर मागणी यावी तितकी येत नाहीं. युद्धोत्तर तेजी आतां मंदावली आहे, व गिऱ्हाईक कसें कायम टिकवावें हा प्रश्न आतां उद्भवला आहे. गेलीं कांहीं वर्षें चहाच्या उत्पादनाचा खर्च वाढत्या प्रमाणांत आहे. कारण, मजुरीवरील खर्च वाढला आहे. प्लँटेशन लेबर ॲक्टची अंमलबजावणी चहाच्या धंद्याच्या बाबतींत करण्यांत आल्यामुळें लहान-लहान मळेवाल्यांना आपलें अस्तित्व टिकवून धरणें कठीण झालें आहे, असें म्हणतात. या परिस्थितीचें चित्र इंडियन टी असोसिएशनच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत नुकतेंच रेखाटलें आहे. गेल्या वर्षी आसामांतील चहाच्या धंद्याला दुष्काळी परिस्थितीस तोंड द्यावें लागलें. अन्न पुरवठा अगदीं बेताचा होता व मिळेल तें अन्न मळ्यांतील मजुरांसाठीं फार जलद पाठवावें लागलें. कांहीं वेळां विमानांतूनहि धान्य पुरवावें लागलें. पूर्व पाकिस्तानमधून पडेल त्या किंमतीला धान्याचा पुरवठा करावा लागून खर्चहि फार वाढला. निवडणुकींत आसाममध्यें कॉंग्रेस पक्ष राजकीय दृष्ट्या विजयी झाला. याचें कांहींसें कारण प्लँटेशन लेबर कायद्याच्या अंमलबजावणीमुळें मजूर वर्ग अन्नधान्य, छत्र्या, ब्लँकेटस्, इ. सुखसोई मिळाल्यामुळें संतुष्ट राहिला हें असावें.

चहाचें पॅकिंग करण्यासाठीं लागणारे खोके हिंदी कारखानदारांपासून कांहीं प्रमाणांत खरेदी करावे लागतात व हे खोके परदेशांतून आयात होणाऱ्या खोक्यांइतके चांगले नसतात, अशी चहाच्या मळेवाल्यांची तक्रार आहे. परंतु अलिकडे देशी कारखानदार आपल्या चहाच्या खोक्यांचा दर्जा सुधारूं लागले असल्यामुळें ही तक्रार दूर होईल. चहाच्या धंद्यापुढील आजचा मुख्य प्रश्न किंमत व गिऱ्हाईक टिकविणें हा आहे. इंडियन टी प्लँटर्स असोसिएशननें हिंद सरकारला पाठविलेल्या पत्रकांत असें विधान केलें आहे कीं, पौंडाला ३ ते ४ आणे या प्रमाणांत व दार्जिलिंग चहाचे बाबतींत ८ आणे या प्रमाणांत किंमत उतरली असल्यामुळें कठीण प्रसंग उद्भवला असून कांहीं मळेवाल्यांना नुकसान सोसून चहा विकावा लागत आहे. तेव्हां, चहावरील निर्गत जकात व उत्पन्नावरील जकात पौंडाला दोन आणे या प्रमाणांत कमी करावी अशी असोसिएशननें मागणी केली आहे. चहाचे मळेवाले व राज्यसरकारांचे प्रतिनिधी यांची परिषद चहाच्या धंद्यापुढील प्रश्नांचा विचार करण्यासाठीं भरविली जाईल, अशी शक्यता आहे.

हिंदचा सर्वांत जास्त चहा ब्रिटनमध्यें खपतो. ब्रिटनच्या यंदाच्या अंदाजपत्रकांत चहावरील मदत रद्द करण्यांत आली आहे. याचा परिणाम चहाच्या खपावर काय होतो हा एक प्रश्न आहे. चहाच्या निर्गतीवरील जकात रद्द व्हावी ही मागणी आज महत्त्वाची आहे. चहाचा अंतर्गत खप थोड्या प्रमाणांत वाढत आहे व तो आणखीहि वाढत राहील. परंतु हल्लीं एकंदर उत्पादनाच्या २० टक्केच चहा हिंदमध्यें खपतो.


दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९९,३८५

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. ना. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशिवाय पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ६२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.